॥ श्री स्वामी समर्थ ॥

असे पातकी दीन मी स्वामीराया
पदी घातलो सिद्ध व्हा उद्धराया।
नसे अन्य त्राता जगी या दीनाला।
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला?

मला माय ना बाप ना आप्त बंधू।
सगा सोयरा सर्व तू दीन बंधू।
तुझा मात्र आधार या किंकराला। समर्था-----

नसे शास्त्र विद्या कलादिक काही।
नसे ज्ञान वैराग्य ते सर्वथा ही।
तुझे किंकर ही अहंता मनाला। समर्था-----

प्रपंची पुरा बद्ध झालो दयाळा।
तुझा दास मी हो स्मृती ना मनाला।
क्षमेची असे याचना त्वत्पदाला। समर्था-----

मला कामक्रोधादिकी जागविले
म्हणोनी समर्था तुला जागविले
नको दूर लोटू तुझ्या सेवकाला। समर्था-----

नको अंत पाहू त्वरे धाव घेई।
तुझ्यावीण नाही कुणी श्रेष्ठ आई।
अनाथासि आधार तुझा दयाळा। समर्था-----

कधी गोड वाणी न येई मुखाला।
कधी द्रव्य ना अर्पिले याचकाला।
कधी मूर्ति तुझी न ये लोचनाला। समर्था-----

मला एवढी द्याल भीक्षा समर्था।
मुखे नित्य गावी तुझी गुण गाथा।
घडो पादसेवा तुझ्या किंकराला।
समर्था तुझ्यावीण प्रार्थू कुणाला?

© www.madhaveeraghuveer.com